# हुकूमनामा

**मा. ३ रे सह दिवाणी न्यायाधिश साहेब (क-स्तर ) न्यायालय गंगापुर यांच्या न्यायालयात**

**आर. सी. एस. नं ६२/ २०२६** **निशाणी १२ अ**

दावा दाखल दि. २५/०२/२०२६
नोंदणी दिनांक २५/०२/२०२६
निकाल दिनांक १४/०३/२०२५
कालावधी:००वर्षे ०२ महिने १२दि.

**वादी** कार्तीक प्रकाश पवार, वय २० वर्ष धंदा- शिक्षण, रा. विजयनगर, विजय चौक,गारखेड परिसर, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

**विरूध्द**

**प्रतिवादी:** १) प्रकाश भिमराज पवार वय- ५२ धंदा- शेती रा. विजयनगर, मल्हार चौक, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर

२) अलका भ्र. प्रकाश पवार, वय ४५ धंदा घरकाम व शेती रा. विजयनगर, मल्हार चौक, घर नं. ४-१९-६० गल्ली नं. ५ क्रांती चौक, एस/ओ संभाजीनगर ता. जि. छत्रपती संभाजीनगर

३) प्रांजल प्रकाश पवार, वय २१ वर्ष गारखेडा परिसर विजय चौक, विजय नगर, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर

**प्रकरण-** **हिंदु वारसा कायदा कलम ६ प्रमाणे व पार्टीशन ॲक्ट प्रमाणे वाटणीआधारे स्वतंत्र ताबा सोबतचे यादी मध्ये नमुद केलेल्या मिळकतीबाबत मिळणेबाबत.**

**महोदय,**

वादी खालीलप्रमाणे निवेदन सादर करीत आहे.

१) वादी व प्रतिवादी नं. ३ हे प्रतिवादी १ व २ चे मुले असून व त्याचे जन्मदाते आई वडिल आहेत व वादी हा प्रतिवादी नं. १ व २ चा मुलगा असून प्रतिवादी नं. ३ ही प्रतिवादी नं. १ व २ ची मुलगी आहे व प्रतिवादी नं. १ व २ हे पती पत्नी असून वादी व प्रतिवादी नं. ३ ही त्याची सख्खी मुलगी आहे, तसेच प्रतिवादी नं. ३ ही वादी व प्रतिवादीची सख्खी बहिण आहे. वादी व प्रतिवादी हे सर्वजन हिंदु एकत्र कुंटुंबाचे घटक आहे. सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेली मिळकत प्रतिवादी नं. १ चे वडिलोपाजित असून वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांची एकत्र कुंटुंबाची मिळकत आहे. सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीचे अनुषंगाने अदयाप पावेतो वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये अदयाप पर्यंत वाटप झालेले नाही. सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेली मिळकत ७/१२ चे रेकॉर्डला व फेरफार रजिस्टरला कौटुंबिक व्यवस्थेच्या धोरणातून प्रतिवादी नं. १ यांच्या नावाने नोंदविण्यात आलेली आहे.

**२)** असे की, अलीकडच्या काळामध्ये सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीचे अनुषंगाने वादी आणि प्रतिवादी यांच्यामध्यें सामाईक उत्पन्नावरून आपसात वाद होत आहे. त्यामुळे वादीस त्यांचे हिश्याची सदरील सोबतचे यादीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीमध्ये वेगळा व स्वतंत्र वाटणी हिस्सा मिळणे जरूरीचे आहे. अदयाप पावेतो वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये नमुद मिळकतीमध्ये वाटणी न झाल्यामुळे व सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेली मिळकत वादी आणि प्रतिवादी यांच्या सर्वांचे संयुक्त ताब्यामध्ये आहे.

**३)** असे की, सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेली मिळकत वाटून विभागून वादी व प्रतिवादी यांना सर्वांना देणे जरूरीचे आहे. सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीशिवाय इतर कोणतेही शेती वडिलोपार्जित व कौटुंबिक मिळकत नाही. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये ७/१२ चे मौजे आंबेवाडी ता. गंगापुर हद्दीतील ७/१२ चे मिळकतीमध्ये हद्दीपावेतो एकमेकाचे संमतीने वाटप झालेले नाही. सदर मिळकत ७/१२ चे रेकॉर्डला मिळकत नोंदविण्यात आलेली आहे. सदर मिळकत मध्ये वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वाटप होणे बाकी आहे त्याकरिता प्रस्तुतचा दावा मा. न्यायालयात वादीतर्फे सादर करण्यात येत आहे.

**४)** असे की, वादी व प्रतिवादी यांचे निवासस्थान व वाद मिळकत मा. न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात असल्यामुळे व मा. न्यायालयास वादीचा दावा ऐकण्याचा व चालविण्याचा पुर्ण अधिकार आहे. वादीतर्फे सोबतच्या यादीमध्ये नमुद केल्याप्रमाणे कागदपत्र सादर करण्यात येत आहे.

५) असे की, वादीतर्फे सोबतचे यादीमध्ये नमुद मिळकतीचे अनुषंगाने १/४ हिश्याची मागणी वाटणी हिस्सा मिळणेकामीची करण्यात येत आहे. वाद मिळकत एकुण ४ हिश्यामध्ये वाटप होणे जरूरीचे आहे. त्याकरिता खालील प्रमाणे कोर्ट फीस देण्यात येत आहे.

अ) मौजे आंबेवाडी ता. गंगापुर येथील शेतगट नं. १०५/२ एकुण क्षेत्रफळ ७ हे ३० आर असून त्यापैकी ६१ आर क्षेत्रफळाची जमिन प्रतिवादी नं. १ चे नावे असून शेतसारा १ रूपया १३ पैसे येत असून ज्याचे +१३-पट ४०० होतात वादी तर्फे सदरील मिळकतीमध्ये १/४ हिश्याची मागणी करण्यात येत असल्यामुळे वादीचे हिश्याचे हद्दीपावेतो शेतसा-याची किंमत ४५२ रूपये येते.

ब) मौजे शिवार आंबेवाडी ता. गंगापुर येथील शेतगट नं. १०५/२ मधील प्रतिवादी नं. १ चे नावे मिळकत ६१ आर ची चतुसिमा खालीलप्रमाणे आहे. पुर्वेस भास्कर विठ्ठलराव गायकवाड यांचे शेत पश्चिमेस - सरकारी रोड, दक्षिणेस कैलास माणिकराव सोनवणे व मंगल भ्र.ज्ञानेश्वर चव्हाण यांची जमिन उत्तरेस राजु भिमराज पवार यांचे शेतजमिन येणेप्रमाणे सदर दाव्यातील नमुद केलेल्या मिळकतीच्या चतुसिमा वरीलप्रमाणे दर्शविलेल्या आहेत. प्रस्तुतचे दाव्याची शेतसा-याची ४०० पट सदरील मिळकतीचे अनुषंगाने ४५२ एकुण कोर्ट फीस रूपये 200/- होतात ज्यासाठी वादीतर्फे २००/- रूपये एकत्रित कोर्ट फीस रूपये जमा करण्यात येत आहे. जी पुरेशी आहे. प्रस्तुतचे दाव्याचे प्रोसेस साठी वादीतर्फेदाव्याची किंमत रूपये १०००/- ठरविण्यात येत आहे. जी पुरेशी आहे.

६) असे की, वादीने प्रतिवादी यांना सोबतचे यादीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीच्या अनुषंगाने वाटप करणे व वादीस त्यांचे हिश्याचे हद्दीपावेतो स्वतंत्र ताबा म्हणून देणेकामी विनंती दिनांक २८/०१/२०२६ रोजी उद्भवण्यासाठीचे कारण प्राप्त झाले असून दावा उद्भवण्याची तारीख २८/०१/२०२६ रोजीची आहे व तेव्हापासून सतत घडत आहे.

७) असे की, वादीतर्फे यापुर्वी मा. न्यायालयात वाटणीसाठी दावा सादर करण्यात आलेला नाही व दावा प्रलंबित नाही

## तडजोडपत्र

महोदय,

वादी आणि प्रतिवादी नं. १ ते ३ यांचेमध्ये आपसात खालीलप्रमाणे तडजोड झाली आहे.

**१)** असे की, वादी हे प्रतिवादी नं. १ व २ चा मुलगा असून प्रतिवादी नं. ३ ही प्रतिवादी नं. १ व २ ची मुलगी आहे. प्रतिवादी नं. १ व २ हे पती पत्नी असून वादी व प्रतिवादी नं. ३ हे दोघे सख्खे भाउ बहिण असून त्यांचे जन्मदाते आई वडिल प्रतिवादी नं. १ व २ हे आहेत व प्रतिवादी नं.२ ही वादी व प्रतिवादी नं. ३ यांची जनकमाता आहे व प्रतिवादी नं. १ हे वादी व प्रतिवादी नं. ३ चे जन्मदाते वडिल आहेत. असे वादी व प्रतिवादी यांना मान्य कबुल आहे.

**२)** असे की, वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ हे एकत्र कुंटुंबाचे घटक असून मौजे आंबेवाडी ता. गंगापुर येथील शेतगट नं. १०५/२ मधील एकुण क्षेत्रफळ ७ हे ३० आर पैकी ६१ आर क्षेत्रफळ जमिन प्रतिवादी नं. १ यांचे नावे मिळकतीचे ७/१२ मध्ये नोंदविण्यात आलेली आहे वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ हे प्रतिवादी नं. १ चे नावे असलेली मिळकत ६१ आर एवढी मिळकत मालक म्हणुन व कब्जेदार म्हणून ७/१२ चे उता-यामध्ये नोंदविण्यात आलेली आहे. एवढ्या क्षेत्रफळाच्या मिळकतीचे वादी व प्रतिवादी नं १ ते ३ यांचा सदर मिळकतीवर सर्वांचा सामाईक ताबा व कब्जा आहे व सदर मिळकतीचे नावाची नोंद महसुल दप्तरी प्रतिवादी नं. १ चे नावाची नोंद ७/१२ चे उता-यात मालकी हक्काच्या रकान्यात करण्यात आलेली आहे. प्रतिवादी नं. २ प्रतिवादी नं. १ ची पत्नी असून वादी व प्रतिवादी नं.३ हे प्रतिवादी नं. १ व २ ची मुले व मुली आहेत. तसेच प्रतिवादी नं. १ यांनी दिनांक २८/०२/२०२६ रोजी ४ साक्षीदार समक्ष प्रतिवादी नं. १ ने व वादी व प्रतिवादी नं. ३ यांचे संमतीने व साक्षीदार नं. १ चेतन भिमराज पवार रा. गंगापुर २. रमेश भोजने, ३. एकनाथ डंक ४. गणेश घाटरे सर्व रा. गारखेडा परिसर विजयनगर (औरंगाबाद) ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या समक्ष प्रतिवादी नं. १ ने प्रतिवादी नं. २ च्या हक्कात संमती वाटणीपत्र १००/-रूपयांच्या बॉण्डवर नोटरी ऑफीसर गंगापुर कार्यालय यांच्या समोर करून देण्यात आलेले आहे.

**३)** असे की, प्रतिवादी नं. १ यांचे नावे मिळकत मौजे आंबेवाडी ता. गंगापुर येथील शेतगट नं. १०५/२ मधील क्षेत्रफळ ६१ आर या मिळकतीची चतुसिमा खालीलप्रमाणे असल्याचे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

**पुर्वेस** -भास्कर विठ्ठलराव गायकवाड यांची जमिन

**पश्चिमेस** - सरकारी रोड

**दक्षिणेस**-कैलास माणिकराव सोनवणे व सौ. मंगल ज्ञानेश्वर चव्हाण याची सामाईक क्षेत्र जमिन ६१ आर

**उत्तरेस**- प्रतिवादी नं. १ याची जमिन

**४)** असे की, सदरील शेतगट नं. १०५/२ आंबेवाडी ता. गंगापुर वर नमुद केलेल्या चतुसिमेच्या आतील वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ हे एकत्र कुंटुंबाचे घटक असून एकमेकांचे वारसदार आहेत. प्रतिवादी नं. १ यांनी त्यांचे हिश्यातून प्रतिवादी नं. २ यांना जमिन क्षेत्रळ ४० आर म्हणजे १ एकर जमिन मिळकत प्रतिवादी नं. २ चे मालकी हक्कात व ताब्यात वाटून दिली आहे व प्रतिवादी नं. १ ते ३ यांना मान्य व कबुल आहे. वादी व प्रतिवादी नं. ३ यांनी पुर्ण संमती दिलेली आहे. सदरचे प्रकरणातील वादग्रस्त मिळकत मधील प्रतिवादी नं. १ यांनी प्रतिवादी नं. २ यांना स्वखुशीने व राजीमर्जीने बक्षीस म्हणून नातेसंबंधाचे मानाने यापुढे पती-पत्नीचे संबंध यापुढील भविष्यकाळात टिकावेत म्हणून प्रतिवादी नं. १ यांनी प्रतिवादी नं. २ यांना त्यांचे मिळकतीतून हिस्सा जमिन ४० आर क्षेत्रफळ जमिन वाटणी व बक्षीस म्हणुन दिलेली आहे व वादी व प्रतिवादी नं. ३ यांनीपण स्वखुशीने व राजीमर्जीने संमती दिलेली आहे.

**५)** असे की, प्रतिवादी नं. १ व २ याची मुले मुलगा नामे वादी स्वतः कार्तीक प्रकाश पवार व प्रतिवादी नं. ३ प्रांजल पवार पवार यांना विचारपुस करून त्यांचे संपुर्ण संमती घेवून प्रतिवादी नं. २ चे हक्कात ४० आर क्षेत्रफळ जमिन प्रतिवादी नं. १ ने विनामोबदला बक्षीस म्हणून प्रतिवादी नं. २ ला देण्यात आलेली आहे असे वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांना मान्य व कबुल आहे यात कोणताही उजर किंवा आक्षेप वादी व

प्रतिवादी यांचेमध्ये राहिलेला नाही प्रतिवादी नं. १ ने प्रतिवादी नं. २ यांना कायमस्वरूपी ४० आर मिळकत ताब्यात व कब्जात दिलेली आहे. यात वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांचा काही आक्षेप नाही. तसेच प्रतिवादी नं. २ यांना वाटून व बक्षीस म्हणुन विनामोबदला दिलेली आहे प्रतिवादी नं. १ व ३ व वादी हे स्वतः त्यांचे मार्फत इतर कोणतेही इसम नातेवाईक घरातील व्यक्ती वारसदार तसेच नातलग यापुढील भविष्यात कधीही ताबा सांगणार नाहीत व अडथळा निर्माण करणार नाहीत, तसेच प्रतिवादी नं. १ यांनी त्यांची मिळकत ६१ आर मधून प्रतिवादी नं. २ यांना वाटून बक्षीस म्हणून व संमती वाटणीपत्र दिनांक २८/०२/२०२६ रोजी साक्षीदारा समक्ष प्रतिवादी नं. २ च्या हक्कात लिहून दिलेली ४० आर क्षेत्रफळ जमिन वाटून दिलेली आहे व वाटून देवून उर्वरित राहिलेली २१ आर क्षेत्रफळ जमिन प्रतिवादी नं. १ यांचीच राहिल. यापुढे प्रतिवादी नं. २ यांना वाटून दिलेले मिळकतवर वादी व प्रतिवादी नं. १ व ३ हे हक्क किंवा ताबा सांगणार नाहीत किंवा अडथळा निर्माण करणार नाहीत. प्रतिवादी नं.२ व प्रतिवादी नं. ३ व वादी यांना वरील प्रमाणे सर्व मजकुर मान्य व कबुल आहे.

६) असे की, सदर तडजोड मधील वादग्रस्त मिळकत मधील वादी व प्रतिवादी नं. १ व ३ यांनी त्यांचे सर्व हक्क व ताबा मालकी हक्काबाबतचे काही एक तक्रार राहिलेली नाही सदर तडजोडपत्रात प्रतिवादी नं. २ चे हक्कात दिलेली वरील नमुद केलेल्या मिळकतीचे एवढया जमिनीचे हद्दीपावेतो वादी व प्रतिवादी नं. १ व ३ यांनी प्रतिवादी नं. २ चे हक्कात मिळकत ४० आर म्हणजे १ एकर जमिन बाबत त्याचे हक्क त्यांनी सोडून दिलेले आहे प्रतिवादी नं. २ यांनी वाढून दिलेल्या मिळकतीची नोंद त्यांचे नावाची नोंद ७/१२ उता-यामध्ये व महसुल रेकॉर्डला व फेरफार रजिस्टरला मालकी हक्काच्या रकान्यात करून घ्यावी. यात वादी व प्रतिवादी १ व ३ यांचा कुठलाही हक्क राहणार नाही. व हक्क सांगणार नाही हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे. तसेच प्रतिवादी नं. २ हे मयत झाल्यानंतर प्रतिवादी नं. १ व ३ हेच वारसदार राहतील. याचेशिवाय इतर कोणीही वारसदार राहणार नाही.

७) असे की, सदरील तडजोडपत्र प्रतिवादी नं. १ ते ३ यांचेमध्ये व वादी याचेमध्ये त्यांचे जवळचे नातेवाईकांनी मध्यस्थी करून प्रतिवादी नं. १ ते ३ व वादी याचेमध्ये मध्यस्थी करून तडजोड करून घडून

आणलेली आहे सदरील तडजोडीनुसार प्रतिवादी नं. १ ने प्रतिवादी नं. २ यांचे हक्कात आंबेवाडी ता. गंगापुर येथील शेतगट नं. १०५/२ मधील ४० आर म्हणजेच १ एकर क्षेत्रफळ जमिन प्रतिवादी नं. २ चे हक्कात केलेल्या तडजोडीआधारे प्रकरण निकाली काढावे व संपविण्यात यावे व प्रकरणाचा हुकमनामा पारित करण्यात यावा व प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढावे.

***प्रस्तुतचा दावा*** दि. १४/०३/२०२६ रोजी लोकअदालत समक्ष श्री आर. एन. पाठक, सह दिवाणी न्यायाधिश व. स्तर गंगापुर यांचे समक्ष वादीतर्फे विधिज्ञ व प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. एस. पी. लबडे व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ बी. जी. लांडे हे हजर होते. सदर दाव्यामध्ये तडजोड होवुन अंतिम आदेश खालील प्रमाणे पारित करण्यात आला.

***O R D E R***

***1. The suit is disposed off accordingly as compromise.***

***2. The court fee be refunded to plaintiff as per rule.***

***3. Decree be drawn up accordingly***

***Sd/-***
***(Rohit N. Pathak)***
***Head of Pannel***
***Jt. Civil Judge Sr. Division Gangapur***

***Date: 14.03.2026***

| | **खर्चाचा तक्ता** | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र** | **खर्चाचे विवरण** | **वादी** | **प्रतिवादी १ ते २ तर्फे** |
| १. | वकील पत्रावरील न्यायालयीन मुद्रांक | १०.०० | १०.०० |
| २. | वादीने दिलेल्या दाव्यावरील न्यायालयीन मुद्रांक | २००.०० | ००.०० |
| ३. | प्रतीवादीने प्रतिदाव्यावर दिलेले न्यायालयीन मुद्रांक | ००.०० | ००.०० |
| ४. | वादीने दिलेले प्रोसेस न्यायालयीन मुद्रांक | ००.०० | ००.०० |
| ५. | निशाणी देण्यात आलेल्या दस्तावरील न्यायालयीन मुद्रांक | २५.०० | ००.०० |
| ६. | इतर खर्च /कॉस्ट | ००.०० | ००.०० |
| ७. | वकील फिस | १५०.०० | १५०.०० |
| | **एकुण** | **३८५.००** | **१६०.००** |

दिनांक **३०/०४/२०२६** रोजी न्यायालयाचे शिक्यानिशी व माझ्या सहीनिशी जारी करण्यात आले.

SHAIKH MOHSIN ASLAM

Digitally signed by SHAIKH MOHSIN ASLAM
Date: 2026.04.30 19:04:16 +0530

दुसरे सह दिवाणी न्यायाधिश गंगापूर